लोकसत्ता

शनिवार, ८ जुलै २००६

# शाळामंजुरीचा वसंत पुरकेंचा निर्णय रद्द
# हायकोर्टाचा दणका

नागपूर, ७ जुलै /प्रतिनिधी

शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करून नवीन शाळांना मंजुरी देण्याचा राज्याचे शिक्षणमंत्री वसंत पुरके यांचा निर्णय रद्द ठरवतानाच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १४९५ शाळांसाठी नव्याने अर्ज मागवण्याचे निर्देश आज दिले. न्यायालयाच्या या निर्णयानंतर पुरके यांनी शाळांना मंजुरी देण्याचा त्यांचा निर्णय मागे घेतला.

न्या० दिलीप सिन्हा आणि न्या० आर०सी० चव्हाण यांनी राज्य सरकार येत्या ६ महिन्यात १४९५ शाळांसाठी नव्याने अर्ज मागवू शकते, असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

अमरावतीच्या महाराष्ट्र राज्य शिक्षण महामंडळाने वसंत पुरके यांच्या १४९५ शाळांना मंजुरी देण्याच्या निर्णयाला जनहित याचिकेतून आव्हान दिले होते. राज्य शासनाने १५ मे रोजी एका आदेशाद्वारे राज्यात १४९५ नवीन शाळा सुरू करण्यास परवानगी दिली होती. त्यात ३२२ मराठी, ३७७ इंग्रजी, ४४५ माध्यमिक व ३५१ उच्च माध्यमिक शाळांचा समावेश होता. २००१मध्ये एका प्रकरणात न्यायालयाने नवीन शाळांना परवानगी देताना पाच मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली होती. शासनाने यासंदर्भात ‘मास्टर प्लॅन‘ तयार करावा, त्यात विद्यमान शाळा, त्यांची क्षमता, शाळा कुठे हवी, त्यात कुठली तुकडी हवी, कुठल्या वर्गाची हवी आणि कुठल्या माध्यमाची हवी यासंदर्भात तपशील असावा, जेथे शाळेची गरज आहे तेथील ठिकाण मंजूर करून जाहिरात प्रकाशित करावी, शाळेचे प्रस्ताव तयार करताना प्रथम ते राज्यस्तरीय समितीकडे जातील, ही समिती छाननी करताना आलेले सर्व प्रस्ताव ‘मास्टर प्लॅन‘ नुसार आहेत किंवा नाही याची तपासणी करेल. शासनाने अंतिम निर्णय घेताना नवीन शाळांमुळे विद्यमान शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, तसेच शाळांमध्ये जीवघेणी स्पर्धा होणार नाही याची दखल घेण्याबाबतचा स्पष्ट उल्लेख करावा, असे या आदेशात सुचवण्यात आले होते. प्रत्यक्षात राज्य शासनाने हा ‘मास्टर प्लॅन‘च तयार केला नाही. त्यामुळे राज्यात शाळांची गरज कोणत्या भागात आहे याची माहिती नसतानाही शासनाने दोन ओळींची जाहिरात प्रकाशित करून नवीन शाळांसाठी प्रस्ताव मागितले होते. या सर्व बाबी न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करणाऱ्या असल्याने नवीन शाळांना दिलेली परवानगी रद्द करावी, अशी विनंती याचिकेतून करण्यात आली होती.

यापूर्वी २००४मध्ये अशाच एका प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या याचिकेची न्यायालयाने दखल घेतली होती. यावेळी तत्कालीन शिक्षण सचिव जयराज फाटक यांनी शपथपत्र दाखल करून भविष्यात न्यायालयाच्या आदेशाचा मान राखला जाईल, अशी हमी दिली होती. त्यावर न्यायालयाने असा प्रकार पुन्हा घडल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल, अशी ताकीदही दिली होती.

■ ■ ■